# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१
ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/नि२८(३)(c)/१०८६/सन २०१४ दि.१८/१२/२०१४

**प्रस्तावना :**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली आहे, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, दि.१२/९/२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रामध्ये दिनांक ११/९/२०१४ रोजीची महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ ची शासन अधिसुचना अधिसुचित होऊन त्या दिवसापासुन हे निवडणुक नियम अमलात आहेत, आणि,

ज्याअर्थी, वरील नियमातील नियम २८ (३) (c) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे,

"If more than ३० % of candidates of the total contesting seats come together and form the group and demand a common symbol by common written application signed by all the concerned candidates, than the Returning Officer may allot them a common symbol "

(अ) वरील नियमाचा अन्वयार्थ एकूण निवडून द्यावयाच्या जागेच्या ३०% उमेदवारांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना एकच निवडणूक चिन्ह देता येईल असे आहे,

(ब) ३० % of candidates of the total contesting seats या इंग्रजी वाक्याचा सरळ अर्थ एकुण लढवत असलेल्या जागांच्या ३०% जागा असा होतो, आणि,

ज्याअर्थी, वरील वाक्यांचा अन्वयार्थ काही वेळा उमेदवारी अर्ज केलेल्या एकूण उमेदवारांच्या ३०% उमेदवारांनी मागणी केल्यास एकच निवडणुक चिन्ह मिळेल असा काढला जाण्याची शक्यता आहे, की ज्यामुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. तथापि नियमानुसार असा अर्थ अभिप्रेत नाही,

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) अधिनियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

### -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) अधिनियम २०१४ चे नियम २८ (३) (c) अन्वये "**एकूण निवडून द्यावयाच्या जागांच्या ३०% उमेदवारांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना एकच निवडणूक चिन्ह देता येईल**" असे स्पष्ट करण्यात येत आहे. त्यानुसार या निर्देशान्वये सर्व संबंधीतांनी कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा. पुणे, यांच्या निर्देशानुसार.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे

१८/१२/१४

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति : १. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)